नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/१०/२०२५ (बुधवार )**

## सोनसाखळी चोरी च्या गुन्ह्याचे आरोपींना अटक – स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण ची कारवाई
## ( एकूण ३ गुन्हे उघडकीस व २ आरोपी अटक आणि १,६५,०००/— रू. चा मुद्देमाल हस्तगत)

**स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण** :– दिनांक १९/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. कोंढाळी** येथे फिर्यादि श्रीमती पिरोणाबाई कोठीरामजी सलाम रा. गोविंदपांजरा, बाजारगाव, या बाहेरगावी जाण्यासाठी पांजरागोविंद येथील बसस्टॅन्ड उभे असता दोन अनोळखी आरोपींनी दुचाकी ने येवून फिर्यादि यांना अमरावती रोड कुठे आहे? असे विचारले फिर्यादि हि त्यांना अमरावती रोड दाखवित असतांनाच दुचाकी वर मागे बसलेल्या आरोपीने फिर्यादिच्या गळ्यात असलेली ४ ग्रॅम वजनी सोन्याची गळसोळी किं. ३०,०००/— रू. हिसकावून घटनास्थळावरून पळून गेले, फिर्यादि यांच्या तक्रारीवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अप. क्रं. ५२२/२५ कलम ३०४, ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हा नोंद झाल्यानंतर मा. पोलीस अधिक्षक, श्री. हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आरोपीचा शोध सुरू केला व तांत्रिक पुरावे, सी.सी.टी.व्ही. फुटेज आणि सायबर सेल च्या माध्यमाने शोध घेवून गुन्ह्याचे **आरोपी नामे १) रूपेश विनोद राठोड वय १८ वर्षे रा. मसाडा आकोली, सेलू जि. वर्धा व २) विजय रंगलाल गुंदी वय १८ वर्षे रा. मसाडा आकोली, सेलू जि. वर्धा** असे निष्पन्न केले. आरोपी क्रं. १ रूपेश राठोड याला सेलू येथून ताब्यात घेवून व आरोपी क्रं. ०२ विजय गुंदी याला बेसा, नागपूर येथून ताब्यात घेवून त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली तसेच आरोपींना विचारपूस केली असता त्यांनी **पो.स्टे. पुलगाव जि. वर्धा**

**येथील अप. क्रं. ८११/२५ कलम ३०४, ३(५) भारतीय न्याय संहिता तसेच पो.स्टे. दहेगाव जि. वर्धा येथील अप. क्रं. ८११/२५ कलम ३०४, ३(५) भारतीय न्याय संहिता हे गुन्हे सुध्दा केले असल्याची कबुली दिली**. सदर आरोपीतांकडून **पो.स्टे. कोंढाळी तसेच पो.स्टे. पुलगाव येथील गुन्ह्यातील मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले वाहन असे एकूण किं. १,६५,०००/— रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला** असून गुन्ह्याचा पुढील तपास पो. स्टे. कोंढाळी करत आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, श्री. हर्ष ए पोद्दर आणि मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांच्या पथकातील सहा. पोलीस निरीक्षक श्री. सागर गोमासे, पोहवा/५२० ईकबाल शेख, पोहवा/३४ शैलेश यादव, पोशि/२२३५ राकेश तालेवार, चालक सफौ/१६६ विनोद तसेच सायबर सेलचे पोहवा/४००सतीश राठोड, पोशि/६२४ मृनाल राऊत, मपोना/१६३६ संगीता गावंडे यांनी पार पाडली.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीताविरूध्द पो.स्टे. कुहि ची कारवाई

## ( एक आरोपी अटक, एकूण किं. २,४८,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन कुहि** :—दिनांक २९/१०/२०२५ रोजी पो.स्टे. कुहि येथील पोलीस स्टॉफ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना टाटा एस माल वाहक वाहन क्रं. एम.एच. ४९/ए.टी. ७१९६ हे संशयास्पद स्थितीत दिसून आल्याने स्टॉफ च्या मदतीने सदर वाहनास मौजा अडवाणी ढाबा या ठिकाणी थांबवून पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **८ गोवंश जनावरे** (२ गायी आणि ३ वासरू आणि ३ हेले) असे मिळुन आले. वाहन चालक नामे सोहेल शब्बीर शेख वय २४ वर्ष रा. प्लॉट नं १७३, गुलशन नगर, खरबी, नागपुर यास गोवंश जनावरे वाहून नेण्याच्या परवान्याबाबत विचारपूस केली असता त्याचे जवळ कोणतेही परवाना नसल्याचे सांगितले व वाहन चालकाने नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा एस माल वाहक**

**वाहन क्रं. एम.एच. ४९/ए.टी. ७१९६ किंमती २,००,०००/— रू. व ८ गोवंश जनावरे किंमती ४८,००० /— रू. असा एकूण किंमती २,४८,०००/— रू. मुददेमाल जप्त केला करून** वाहन चालक आरोपी नामे **सोहेल शब्बीर शेख वय २४ वर्ष रा. प्लॉट नं १७३, गुलशन नगर, खरबी, नागपुर** याच्या विरूध्द **कलम ११(१), ११(१)(डी), ११(१)(इ), ११(१)(एफ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम १८४ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.** पुढील तपास सपोनि शितल राणे पो.स्टे. कुहि करित आहेत.

## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**(एकूण ८ आरोपीविरूध्द ८ गुन्हे नोंद. एकूण ५,५९० /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

**पोलीस स्टेशन उमरेड**:— दिनांक २८/१०/२०२५ रोजी पो.स्टे. उमरेड येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा गांगापुर चौकाकडुन रेल्वे पटरी कडे जाणारा रोड वर** अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे अशोक किसन मांढरे वय ६५ वर्ष रा. गांगापुर, ता. उमरेड** वर पंचासमक्ष धाड टाकूण **७ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ७०० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा तारणा उमरेड** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे काशिराम उरकुडा दिघोरे वय ७७ वर्ष रा. तारणा तह. कुही जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू संत्रा ९९९ च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा ब्रामणी उमरेड** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून देशी दारू संत्रा ९९९ च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४००/—रू. ची** दारू जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. उमरेड येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. १५००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक २८/१०/२०२५ रोजी पो.स्टे. सावनेर येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा यशवंबाबा झोपडपटी सावनेर** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे विनोद पांडुरंग नारनवरे वय ४५ वर्ष रा. वार्ड क. ०६, यशवंबाबा झोपडपटी, सावनेर** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू भिंगरी संत्रा च्या ९० एम.एल. क्षमतेच्या ११ बॉटल प्रति बॉटल ४०/— रू. प्रमाणे एकूण **४४०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेचतसेच **२) मौजा नेहरू मार्केट सावनेर** अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे वैभव सुरेश रूषीया वय २७ वर्ष रा वार्ड क्र १७ पहलेपार ता. सावनेर** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू संत्रा च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४००/— रू. ची** दारू जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला.

( अशा प्रकारे पो.स्टे. सावनेर येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. ८४०/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन मौदा**:— दिनांक २८/१०/२०२५ रोजी पो.स्टे. मौदा येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा वडोदा ता.कामठी** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे विशाल राजेन्द्र उके वय २८ रा. वडोदा ता.कामठी** वर पंचासमक्ष धाड टाकूण **१० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर ९०/— रू **प्रमाणे एकूण ९००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा वडोदा ता.कामठी** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे योगेश पुरूषोत्तम वाडीवे वय २९ रा.वडोदा ता.कामठी** वर पंचासमक्ष धाड टाकूण **१५ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर ९०/— रू **प्रमाणे एकूण १३५०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. मौदा येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. २२५०/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २८/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन रामटेक येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. रामटेक हद्दीतील मौजा **चाचेर सावंजी ढाबा** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे दिपक नामदेव मानेराव वय ३७ वर्ष रा कोळंबी रा काटोल ह मु चाचेर तामौदा जि नागपुर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून ९० एम.एल. क्षमतेच्या २५ बॉटल देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ प्रति बॉटल किं. ४०/— रू. प्रमाणे एकूण किं. **१०००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे एकूण ८ आरोपीविरूध्द ८ गुन्हे नोंद व एकूण ५,५९० /— रू. चा मुद्देमाल जप्त**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २९/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे श्री. तुषार राऊत, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी परिसरातील नागरिकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. ऑनलाईन गेमिंग च्या आर्थिक फसवणुकीला बळी पडु नका.**

**२. अधिकृत संकेतस्थळ किंवा ॲप पडताडणी करूनच खरेदी करा. अनोळखी खरेदी लिंक वर क्लिक करू नका.**

३. मोबाईल मध्ये **APK** फाईल डाउनलोड करून नका.

४. फसव्या लोन ॲप च्या अमिषाला बळी पडु नका.

५. कोणत्याही आमिषाला बळी पडु नका सायबर गुन्हेगाराच्या जाळयात अडकु नका.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने